
केंद्राच्या यादीवरचे व राज्यशासनाच्या यादीवरचे संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होणारे दैनिक



दैनिक राजस्व

RNI. NO. MAHMAR 2011/39185



सोलापूर ▸ वर्ष १४ वे ▸ अंक -२९२ मराठी सायंदैनिक ▸ शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६ पाने ६ किंमत २ रुपये

# मुंबईतील इंग्रजी माध्यमाची शाळा बंद करण्याचा निर्णय

मुंबई : नव्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेला शाळांमध्ये सुरुवात झाली असतानाच मुंबईतील जोगेश्वरमधील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेनं विद्यार्थ्यांना दाखले घेऊन जाण्याचे सांगितल्याने पालकांमध्ये खळबळ उडाली आहे. शहरातील जोगेश्वरी पश्चिम परिसरात सिटी इंटरनॅशनल शाळा अचानक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. शाळा प्रशासनाकडून शाळा बंद करण्यासाठी शाळेत शिकणाऱ्या ६०० विद्यार्थ्यांच्या पालकांना नोटीस देण्यात आली आहे. मात्र, अचानक शाळा बंद करण्याच्या निर्णय घेतल्यामुळे शाळेत शिकणारे विद्यार्थ्यांचे पालकांमध्ये मुलांच्या भविष्याच्या काळजीने भीतीच्या वातावरण पसरले आहे. तर, मनसेनं याची दखल घेत शाळेत धाव घेतली.

जोगेश्वरी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल (शाळा) बंद करण्याच्या निर्णयावर पालकांनी काळजी बाळगून मनसे नेत्यांशी संपर्क साधला असता, मनसे नेते आक्रमक झाल्याचं दिसून आलं. मनसे वर्सोवा विधानसभा विभाग अध्यक्ष संदेश देसाईंकडून शाळा बंद होऊ देणार नाही, असा म्हणत शाळा प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे. ओशिवरा परिसरातील ही शाळा, सिटी इंटरनॅशनल स्कूल नावाने मागील २५ वर्षापासून सुरू आहे, येथील शाळेत ६०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, शाळा भाडे तत्त्वावर असल्यामुळे जागा मालकाकडून महिन्याचे भाडे ३५ लाख रुपयांच्या जागेवर आता ५० लाख रुपये भाडे आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, या भाडेवाढीला विरोध करत शाळा प्रशासनाने चक्क शाळाच बंद करण्याचा निर्णय घेतल्याने शाळेच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. शाळा प्रशासनाला हे भाडं परवडत नसल्यामुळे शाळा प्रशासनाने शाळा बंद करण्याचे निर्णय घेतला आहे. मात्र, अचानक शाळा बंद करण्याचे निर्णय घेतल्यामुळे पालकांमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा बंद करण्याची माहिती मिळतच मनसेकडून शाळा प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. शाळा प्रशासनाकडून जर शाळा बंद करण्याची भूमिका ठाम राहिली आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वार्षिक नुकसान झालं तर शाळेविरोधात मनसे तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. मनसे वर्सोवा विधानसभा विभाग अध्यक्ष संदेश देसाई यांच्या शिष्टमंडळाकडून आज शाळा व्यवस्थापकांसोबत भेट घेऊन चर्चा करण्यात आली.

# 'एमपीएससी'ची गुणवत्ता यादी जाहीर,

## नीलेश मनोहरराव महाजन राज्यात पहिला

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

नागपूर: सहायक प्राध्यापक, क्षयरोग व उरोरोगशास्त्र, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, वैद्यकिय शिक्षण व संशोधन सेवा, गट – ब या संवर्गाच्या मुलाखती ११ व १२ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या होत्या. विचाराधीन संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल (मूळ अर्ज ४२/२०२६) प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रस्तुत संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून, उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्र/कागदपत्रे पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी, उमेदवारांचा गुणवत्ताक्रम बदलू शकतो किंवा उमेदवार अपात्र देखील ठरू शकतो याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. नीलेश मनोहरराव महाजन यामध्ये पहिले आहेत. या गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारांचे गुणही जाहीर करण्यात आले आहेत. नव्याने स्थापन झालेले शासकिय वैद्यकिय महाविद्यालय धाराशिव येथे सहायक प्राध्यापकांची ३४ पदे असून, सिंधुदुर्गमध्ये ३० पदे आहेत. यामध्ये साडेसात टक्के आरक्षण असलेल्या आदिवासी समाजाला एकही पद नाही. अलिबागमध्ये २९ पदे असून, यात आदिवासींना केवळ एक पद, साताऱ्यात ३१ पदे असून, इथेही एकच पद आहे. परभणीत २२ पदे असून, यात दोन पदे आदिवासींना आहेत. शासकिय वैद्यकिय महाविद्यालयातील तसेच नव्याने स्थापन झालेल्या शासकिय वैद्यकिय महाविद्यालये, धाराशिव, अलिबाग, सिंधुदुर्ग, नंदुरबार, परभणी व सातारा येथील विविध विभागातील सहायक प्राध्यापक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन सेवा, गट- ब या संवर्गातील पदांच्या भरतीकरिता ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. एमपीएससीमार्फत ५ डिसेंबर २०२३ रोजी तशी जाहिरात देण्यात आली होती. सहायक प्राध्यापक पदांच्या ५८० जागा असून, नव्याने स्थापन झालेल्या सहा शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांतील १८५ पदे अशा एकूण ७६५ जागांचा समावेश आहे. याची परीक्षा झाली असून तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे.

सहायक प्राध्यापक, क्षयरोग व उरोरोगशास्त्र, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, वैद्यकिय शिक्षण व संशोधन सेवा, गट – ब या संवर्गाच्या मुलाखती ११ व १२ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या होत्या. मुलाखतीनंतर आता तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे.

# अजित पवारांच्या विमान अपघाताचे पत्ते उलगडणार

### राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री असताना एएआयबीची स्थापन करण्यात आली होती.

मुंबई : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या संदर्भात केंद्रीय उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी एएआयबीची चौकशी लावली आहे. एएआयबी ही स्वतंत्र चौकशी संस्था असून ती केंद्रीय हवाई उड्डान मंत्रालयाच्या अंतर्गत येत नाही. या चौकशी यंत्रणेला जगातील कोणत्याही चौकशी यंत्रणेची मदत मागून या अपघाताची चौकशी करता येते अशी तरतूद आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले आहेत. तसेच, या घटनेची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी झाली पाहिजे, अशीही मागणी त्यांनी केली होती. त्यानुसार, आता चौकशी सुरू झाल्याचे दिसून येते.

राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री असताना एएआयबीची स्थापन करण्यात आली होती. आपल्या देशात विमान दुर्घटनेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी करण्याकरिता संघटना पाहिजे म्हणून या चौकशी समितीची निर्मिती करण्यात आली होती. दुर्घटनेतील सत्य समोर आलं पाहिजे आणि अपघातसंदर्भाने मुळात दोनच गोष्टी या चुकीच्या असू शकतील. एकतर वैमानिकाचा दोष किंवा विमानाचा दोष. त्यामुळे अपघाताची सगळी चौकशी झाली पाहिजे अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. या पलीकडे कोणती चौकशी करण्याची समिती असेल त्याची सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मागणी करेन. पण, एएआयबीला चौकशीचे सर्वाधिकार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी एबीपी माझाला दिली. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून आमदार रोहित पवार यांच्याकडून सातत्याने अपघात की घातपात या अनुषंगाने चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली जात असताना आता ही चौकशी सुरू झाल्याचे समोर आलं आहे.



राजस्व




## संपादकीय

### योजनांतर

निकोला टेस्ला हे मोजक्या विज्ञान प्रज्ञावंतांपैकी एक. त्यांच्या अनेक कल्पना आज प्रत्यक्षात आल्या. विजेवर चालणाऱ्या मोटारींचे नाव 'टेस्ला' ठेवले गेले ते त्यांच्या गौरवार्थ. या टेस्लांच्या अनेक कल्पना 'चोरून' इतरांनी प्रत्यक्षात आणल्या. त्याबाबत विचारले असता टेस्ला म्हणाले: माझ्या कल्पना 'त्यांनी' चोरल्या याचे मला वैषम्य नाही; पण 'त्यांना' स्वत:चे काही सुचत नाही याचे मात्र मला दु:ख होते. 'महात्मा गांधी नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी अ‍ॅक्ट' ऊर्फ 'मनरेगा' ही काँग्रेसची आणखी एक योजना नामांतर करून सत्ताधाऱ्यांनी 'आपली' म्हटली. खरे तर निकोला टेस्ला यांचे हे विधान काँग्रेसजनांस उपयुक्त. पण ते नेतृत्वही बौद्धिक युक्तिवादापेक्षा थयथयाट करण्यात मग्न. तेव्हा साऱ्या चर्चेलाच उथळपणा आल्यास आश्चर्य ते काय? काँग्रेसकडून दत्तक घेतलेल्या 'नीती आयोग', 'आधार' ते 'मनरेगा' अशा जवळपास डझनभर योजनांचे पालक आपणच असे भाजप मिरवत असला तरी त्याची चर्चा नव्याने करण्याचे कारण नाही. नाही काही नवे सुचत भाजप नेतृत्वास, असे या संदर्भात म्हणता येईल. पण म्हणून जुन्यांचे काही प्रत्यक्षात आणू नये असा काही नियम नाही. काँग्रेसच्या तर काँग्रेसच्या. सत्ताधारी भाजप योजना राबवतो हे महत्त्वाचे. तेव्हा 'मनरेगा'चे नामकरण 'विकसित भारत-गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीवक मिशन (ग्रामीण)' ऊर्फ 'व्हीबी-जी राम-जी' असे करणारा सत्ताधाऱ्यांचा ठराव संसदेत मंजूर झाला असला, कसेही करून त्यातून गांधी हटवण्याचा प्रयत्न दिसत असला आणि कसेही करून त्यात 'राम' आणण्याचे कष्ट कितीही विनोदी वाटले तरी त्याची चर्चा टाळून या बदलामुळे नक्की साध्य काय होणार याचा ऊहापोह अधिक शहाणपणाचा. आणि गरजेचाही. त्यावर भाष्य करण्याआधी या योजनेचे मूळ लक्षात घेणे गरजेचे. या योजनेचे खरे जनक गांधीवादी काँग्रेसी विठ्ठल सखाराम उपाख्य वि. स. पागे. ते विधिमंडळाचे सभापती असताना राज्यात अभूतपूर्व दुष्काळ पडला आणि गरीब शेतमजूर, शेतकरी अन्नास मोताद झाले. त्या वेळी त्यांनी, आपल्या घरात किती पैसे असतील असे पत्नीस विचारले. रक्कम दोनपाचशेपेक्षा अधिक नाही हे ऐकल्यावर आपली अशी स्थिती तर या शेतमजूर, अल्पभूधारक शेतकऱ्यांचे काय होणार याची चिंता त्यांना लागली आणि त्याच रात्री लगोलग मुंबई गाठून मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडे गरिबांच्या हातास संकटकाळी काम मिळेल आणि त्या बदल्यात त्यांना काही आर्थिक मदत करता येईल, अशा योजनेचा हट्ट धरला. त्या वेळी व्यापक जनकल्याण हा मुद्दा राजकारण्यांच्या कार्यक्रमपत्रिकेवर असल्याने तशा योजनेच्या आरेखनासाठी सर्व पक्षीय प्रयत्न झाले आणि 'रोजगार हमी योजना' जन्मास आली. पंतप्रधानपदी असताना मनमोहन सिंग यांच्यासारख्या अर्थवेत्त्यास तिचे महत्त्व लक्षात आले आणि त्यांनी 'मनरेगा' असे तिचे नामकरण करून संपूर्ण देश हे तिचे अंमलबजावणी क्षेत्र केले. अशा तऱ्हेने महाराष्ट्राची योजना राष्ट्रीय झाली. तेव्हा तिचे मूळ स्वरूप बदलण्याचा प्रयत्न होत असेल तर खरे तर या राज्यातील राजकारण्यांनी त्यास विरोध करायला हवा. परंतु ज्या गावच्या बोरी; त्याच गावच्या बाभळी. महाराष्ट्रातील राजकारण्यांस देशास अभिमान वाटावा अशी योजना आपल्यातील काहींनी दिली आणि आता तिचे अस्तित्व पुसून टाकले जात आहे याचे वैषम्य वाटण्याचा प्रश्न नाही. असो. तरी हा इतिहास का लक्षात घ्यावयाचा? कारण त्यामुळे या योजनेचे मूळ आणि अपेक्षित स्वरूप लक्षात येते. ते 'खालून वर' असे आहे. म्हणजे देशाच्या कोणत्याही भागात नैसर्गिक वा अन्य कारणांनी काही आर्थिक ताण निर्माण झाल्यास वरून, म्हणजे केंद्रातून, त्यासाठी उत्पादक योजना आखणे. याचा दुसरा अर्थ ही योजना 'मागणीप्रधान' अशी आहे. आणि म्हणून ती उपयुक्त आहे. मागणी असेल तरच सरकारने योग्य ती रसद पुरवावी. मागणी आणि पुरवठा ही कोणत्याही अर्थव्यवहाराची दोन चाके. मागणी असूनही पुरवठा न झाल्यास ताण वाढतो आणि मागणी नसताना पुरवठा झाल्यास तो अतिसैल होतो. 'मनरेगा'चे नामांतर 'जी रामजी' असे केल्याने बदल होणार आहे तो हा. म्हणून त्यास विरोध अत्यावश्यक ठरतो. हे काही केवळ नामांतर नाही. हे संपूर्ण योजनांतर आहे. केंद्रास ते करावयाचे आहे कारण 'खालून वर' हा दृष्टिकोनच या सरकारला नाही. त्यांचा सगळा भर आहे तो 'वरून खाली' याच तत्त्वावर. त्यामुळे सर्व काही केंद्राहाती असावे असा त्यांचा आग्रह आणि प्रयत्न असतो. 'मनरेगा'च्या मुळावर येणार आहे तो केंद्राचा हा दृष्टिकोन. कारण यापुढे या योजनेचे स्वरूप बदलेल. मागणी असली तरी ती मान्य करावयाची की नाही याचा निर्णय घेतला जाईल आणि त्याबाबतचे सर्वाधिकार केंद्रास असतील. राज्यांनी फक्त खर्चातील वाटा तेवढा उचलायचा. याआधी हे प्रमाण ९०:१० असे होते. म्हणजे राज्य सरकारने फक्त १० टक्के इतकाच खर्च करायचा आणि उरलेले सर्व केंद्राकडून अनुदान म्हणून घ्यायचे. आता केंद्र योजनेवर नियंत्रणही ठेवणार, राज्यांच्या ती राबवण्याच्या अधिकारावरही गदा आणणार आणि वर ४० टक्के रक्कम राज्यांनाच भरा असे म्हणणार. महसुलाबाबत राज्यांची आणि केंद्राची बरोबरी होऊच शकत नाही. एकतर नोटा छापण्याचा अधिकार केंद्राहाती असतो आणि जे काही महसूलवृद्धीचे स्वातंत्र्य राज्यांस होते ते 'वस्तू आणि सेवा कर' (जीएसटी) आणून केंद्राने त्यावरही गदा आणली. अशा परिस्थितीत राज्ये इतक्या जीवनदायी योजनेवर खर्च करणार तरी कसा? त्यासाठी निधी आणणार तरी कोठून? तेव्हा तमिळनाडू, पश्चिम बंगाल यांसारखी राज्ये या नव्या योजनेच्या विरोधात उभे राहत असतील तर ते योग्यच. त्यांचा विरोध राजकीय नाही, हे समजून घ्यायला हवे. भाजपशासित राज्यांत कोणाची माय व्यायली आहे जी केंद्रास विरोध करेल? तेव्हा ही योजना देशाच्या संघराज्य व्यवस्थेच्या विरोधात आहे हे अमान्य करता येणे अशक्य. ते मान्य केल्यास भाजपला काश्मीर ते कन्याकुमारी आपल्याच पक्षाचे सरकार का हवे आहे, यामागील कारणही लक्षात येईल. हा योजना बदल करताना आपण १०० दिवसांच्या जागी काम देणाऱ्या दिवसांची संख्या १२५ करीत आहोत असा औदार्याचा आव केंद्र आणते. पण ही लबाडी आहे. या संदर्भातील आकडेवारी हे दाखवून देते की प्रत्यक्षात २०२०-२१चा करोना कालखंड सोडला तर अन्य वर्षांत एकदाही या योजनेंतर्गत १०० दिवस काम देता आलेले नाही. करोनाकाळात जवळपास ७२ लाख कुटुंबाना १०० दिवस काम मिळाले.

# नसांत साचलेलं खराब कोलेस्ट्रॉल एका दिवसात बाहेर पडेल





आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव व सततचा ताणतणाव यांमुळे हाय कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब व हृदयविकाराच्या तक्रारी झपाट्याने वाढताना दिसत आहेत. अनेक जण महागडी औषधे, पूरक आहार किंवा उपचारांकडे धाव घेतात. पण तुम्हाला माहीत आहे का, तुमच्या स्वयंपाकघरात रोज वापरला जाणारा एक साधा पाला तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी एखाद्या औषधासारखा काम करू शकतो? तज्ज्ञांच्या मते, आपल्या रोजच्या जेवणात वापरली जाणारी हिरवी, सुगंधी आणि सहज उपलब्ध होणारी पाने हृदयाच्या आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त ठरू शकतात. ही पाने केवळ चव वाढवत नाही, तर ती शरीरातील चरबी, रक्तातील घातक घटक आणि नसांमधील अडथळे कमी करण्यास मदत करू शकतात. या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट्स, फायबर आणि काही विशिष्ट जैव-सक्रिय घटक आढळतात, जे शरीरातील चांगल्या आणि वाईट कोलेस्ट्रॉलमध्ये संतुलन राखण्यास साह्य करतात. त्यामुळे रक्तवाहिन्या स्वच्छ राहण्याची शक्यता असते आणि रक्ताभिसरण सुधारू शकते. परिणामी, हृदयावर येणारा ताण कमी होण्यास मदत होते. इतकेच नव्हे, तर ही पाने रक्तदाब संतुलित ठेवण्यास मदत करू शकतात. हृदयाच्या स्नायूंना बळकटी देऊ शकतात. ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास सहायक ठरू शकतात. पचनक्रिया सुधारण्याची क्षमता त्यात आहे. मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास साह्यभूत ठरतात. केसांच्या आरोग्यासाठीही ती उपयुक्त मानली जातात. ही पाने आहारात अनेक प्रकारे वापरता येतात. ही पाने फोडणीमध्ये वापरून, चटणी करून, सूप किंवा डाळीत मिसळून, चहात घालून किंवा अगदी थोडीशी चावून खाल्ल्याने अशा अनेक प्रकारे या पानांचे फायदे मिळू शकतात. आता हा प्रश्न पडतो की, ही एवढी गुणकारी पाने नेमकी आहेत तरी कसली? तर, ती साधी, सुगंधी आणि प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात सापडणारी पाने आहेत ती म्हणजेच कढीपत्ता. भारतीय स्वयंपाकात कढीपत्त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सांबार, उपमा, पोहे, वरण, भाजी किंवा दहीवडे कढीपत्त्याचा फोडणीद्वारे पदार्थात प्रवेश झाला की, त्याची चवच बदलते. बहुतेक जण कढीपत्ता फक्त चव आणि वासापुरताच वापरतात. मात्र, आयुर्वेद आणि पारंपरिक उपचारांमध्ये कढीपत्त्याला आरोग्यदायी औषधी मानले जाते. (टीप : हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने दिलेला आहे. त्यातील माहिती वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांना पर्याय नाही. अधिक तपशिलासाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. लेखातील माहितीची

# ब्रश केल्यानंतरही तोंडातून वास येतोय का? फक्त ५ मिनिटांत तोंडाची दुर्गंधी घालवणारे ९ घरगुती उपाय !



तोंडाची दुर्गंधी ही एक समस्या आहे, जी केवळ तोंडाच्या अस्वच्छतेबाबत सांगत नाही तर अनेकदा सामाजिक आणि भावनिक पेच निर्माण करू शकते. तोंडाला घाण वास येत असेल तर तुम्हाला मित्र, सहकारी आणि कुटुंबासमोर अस्वस्थ वाटू शकते. लोक अनेकदा ही समस्या किरकोळ म्हणून दुर्लक्ष करतात. मात्र ती एखाद्या अंतर्निहीत आजाराचे लक्षण देखील असू शकते. तोंडाच्या दुर्गंधींची अनेक कारणे असू शकतात. तोंडाची अस्वच्छता, जिभेवर बॅक्टेरियाचा जाड थर, वारंवार कोरडे तोंड, गॅस किंवा अपचन सारख्या पोटाच्या समस्या, हिरड्यांचे आजार आणि पायरिया अशी एक ना अनेक कारणं आहेत. काही प्रकरणांमध्ये सतत येणारा दुर्गंध डायबिटीज, किडनी किंवा लिव्हरसंबंधित आजारांचे लक्षण देखील असू शकतो. आयुर्वेदात, तोंडाची दुर्गंधी ही केवळ एक समस्या नाही तर शरीरातील अंतर्गत असंतुलनाचे लक्षण मानली जाते. आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. विनोद शर्मा यांनी दि इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, काही घरगुती उपायांचा अवलंब करून तुम्ही केवळ तोंडाची दुर्गंधी तर दूर करू शकता शिवाय हिरड्या देखील निरोगी बनवू शकता. आयुर्वेदानुसार, तोंडाची दुर्गंधी ही केवळ एक समस्या नाही, तर शरीरातील अंतर्गत असंतुलनाचे लक्षण मानली जाते. तेव्हा तोंडाची दुर्गंधी दूर करण्यासाठी कोणते उपाय प्रभावी ठरतात याबाबत जाणून घेऊ

भाजलेल्या लवंग चावा
लवंगमध्ये युजेनॉल कंपाउंड तोंडाच्या दुर्गंधीचे मुख्य कारण असलेल्या बॅक्टेरियांना मारण्यास मदत करते. दररोज १-२ हलक्या भाजलेल्या लवंगा चावल्याने तोंडातील बॅक्टेरिया कमी होण्यास आणि श्वास ताजेतवाने होण्यास मदत होते. झोपेतून उठल्यावर तोंडाची दुर्गंधी येणाऱ्यांसाठी हा उपाय फायदेशीर आहे.

ज्येष्ठमध किंवा सुकवलेले धणे चघळणे
ज्येष्ठमध आणि सुकवलेले धणे दोन्ही तोंडाला नैसर्गिकरित्या ताजेतवाने ठेवतात. ज्येष्ठमधात अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, ते तोंडातील हानिकारक बॅक्टेरिया कमी करतात. सुकवलेले धणे चघळल्याने लाळेचे उत्पादन वाढते. त्यामुळे तोंड कोरडे पडत नाही आणि तोंडाची दुर्गंधी हळूहळू कमी होते.

कोथिंबीरची पाने चावा
कोथिंबीरच्या पानांमधील क्लोरोफिल तोंडाची दुर्गंधी दूर करण्यास मदत करते. जेवणानंतर दररोज काही ताजी कोथिंबीरची पाने चावल्याने तुमचे तोंड स्वच्छ राहण्यास आणि श्वास ताजा राहण्यास मदत होते. खाल्ल्यानंतर ज्यांना जास्त दुर्गंधी येते त्यांच्यासाठी हा उपाय फायदेशीर आहे.

बडीशेपचे नियमित सेवन
आयुर्वेदात तोंडाच्या दुर्गंधीवर बडीशेप हा एक प्रभावी उपाय मानला जातो. सकाळी आणि संध्याकाळी जेवणानंतर अर्धा चमचा बडीशेप चावल्याने पचन सुधारते आणि तोंडाची दुर्गंधी कमी होते. बडीशेप लाळ ग्रंथी सक्रिय करते, तोंड कोरडे पडण्यापासून रोखते आणि श्वास जास्त काळ ताजा ठेवते.

पुदिन्याची पाने
पुदिन्याची पाने पाण्यात बारीक कुस्करल्याने तोंडाच्या दुर्गंधीपासून आराम मिळतो. दिवसातून दोनदा हे केल्याने तोंडाची दुर्गंधी येणार नाही. पुदिना गारवा देतो आणि बॅक्टेरिया नष्ट करतो. ज्यांना सतत तोंडाची दुर्गंधी असते त्यांच्यासाठी हा उपाय फायदेशीर आहे.

आल्याचा रस
एक ग्लास पाण्यात एक चमचा आल्याचा रस मिसळून गुळण्या केल्याने तोंडातील बॅक्टेरिया कमी होण्यास मदत होते. आल्यामध्ये दाहक विरोधी आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा गुणधर्म असतो. त्यामुळे हिरड्या निरोगी राहतात. नियमित वापरामुळे तोंडाची दुर्गंधी हळूहळू दूर होते.

लिंबू पाणी
अर्धा लिंबू एक ग्लास पाण्यात पिळून दिवसातून दोनदा तोंड स्वच्छ केल्याने तोंडाची दुर्गंधी कमी होण्यास मदत होते. लिंबूमधील व्हिटॅमिन सी बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखते आणि तुमचे तोंड ताजे ठेवते. असं असलं तरी संवेदनशीलता जास्त असलेल्या लोकांनी ते कमी प्रमाणात वापरावे.

मोहरीचे तेल आणि मिठाने हिरड्यांची मालीश
ज्यांना उच्च रक्तदाब नाही, त्यांच्यासाठी मोहरीच्या तेलात चिमूटभर मीठ मिसळून हिरड्यांना मालीश करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकते. यामुळे हिरड्या मजबूत होतात आणि बॅक्टेरिया नष्ट होतात. दररोज मालीश केल्याने तोंडाची दुर्गंधी आणि हिरड्यांच्या समस्या कमी होण्यास मदत होते.

व्हिटॅमिन सी समृद्ध फळे
लिंबू, संत्री आणि द्राक्ष यासारखी व्हिटॅमिन सी समृद्ध फळे तोंडाची दुर्गंधी कमी करण्यास मदत करतात. ही फळे लाळेचे उत्पादन वाढवतात आणि बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखतात. तुमच्या दैनंदिन आहारात या फळांचा समावेश केल्याने तुमचा श्वास ताजा राहण्यास मदत होते, शिवाय तुमच्या हिरड्या आणि दातांचे आरोग्य देखील सुधारते.

This daily evening news paper ,owner,publisher ,printer, Editor,Prasad Sanjay Pawar, printed at RAJASWA printing press , 53/A Budhawar Peth ,Laxman Maharaj Nagar ,SOLAPUR and published here It is not possible that editors of this article will agree ( solapur jurisdiction) Mo-7387386385

सायंदैनिक राजस्व



# सिव्हिलमध्ये बंद पडलेली एमआरएम मशीन लवकर सुरु होणार



सोलापूर : छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात (सिव्हिल) सात महिन्यांपासून एमआरआय मशीन बंद आहे. एमआरआयची चाचणी महागडी आहे. सिव्हिलमध्ये कमी पैशात एमआरआय चाचणी होत असल्याने सोय होत होती. पण, ती मशिनच बंद असल्याने रुग्णांना आता तपासणीसाठी खासगी केंद्रावर जावे लागत आहे. ११ वर्षांच्या वापरानंतर जुन्या मशीनची वैधता संपली आहे. नव्या एमआरआय मशीनसाठी ऑर्डर मिळाली आहे. पण, जुन्या मशिनच्या जागीच नवी मशीन बसवण्यात येणार आहे. परंतु, जुनी मशीन काढण्यासाठी शासनाने अद्याप मान्यता दिलेली नाही. आणखी महिनाभर तरी नवीन मशिन सुरु होण्याची शक्यता नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. ११ वर्षांपूर्वीच्या एमआरआय मशीनचा वैद्यकीय कालावधी संपल्यामुळे सात महिन्यांपूर्वी हे मशिन बंद करण्यात आले.

राज्य सरकारने आता सिव्हिलमध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप तत्वावर सिव्हीलमधील एमआरआयची सुविधा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी एका प्रायव्हेट कंपनीची नियुक्तीही करण्यात आली आहे. त्या मशीनचे ऑपरेटिंग खासगी कंपनीकडूनच होणार आहे. शिवाय त्यांच्यामार्फतच सवलतीच्या दरात चाचण्या केल्या जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

# इंडोनेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी सोलापूरच्या ७ खेळाडूंची निवड




सोलपूर ; गोवा मडगाव येथे घेण्यात आलेल्या मिशन ओलंपिक स्केटिंग गेम्स ऑफ इंडिया लूप स्पोर्ट्स व GSF यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या राष्ट्रीय स्केटिंग चॅम्पियनशिप व इंटरनॅशनल सिलेक्शन ट्रायल मध्ये सोलापूर मधील ७ खेळाडूंची निवड करण्यात आली ऋषिता संतोष माळवतकर शर्विल संतोष माळवतकर स्वानंदी स्वामीनाथ काळे स्वराली स्वामीनाथ काळे सक्षम अनिल हुच्चे विनायक सुनील हुचे लास्या नरेंद्र शेरला. इंडोनेशिया येथे होणाऱ्या इंटरनॅशनल स्केटिंग स्पर्धेसाठी मिशन ओलंपिक स्केटिंग गेम्स ऑफ इंडिया अधिकृत यांच्याकडून टीम इंडियाचे प्रतिनिधित्व करणार आहे यांच्याकडून स्पर्धेसाठी इंटरनॅशनल स्कॉलरशिप मिळणार आहे.

स्केटिंगच्या क्रीडा विश्वात पुन्हा एकदा सोलापूर जिल्ह्याचा दबदबा कायम राखला. सर्व विजयी खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे सर, सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी दत्तात्रय वरकड सर आणि दयानंद महाविद्यालय सोलापूरचे प्रशासक प्रा डॉ विजयकुमार उबाळे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक सागर राठोड व सम्यक मोहोळकर यांचे मार्गदर्शन लाभले

# जिल्हयात पॅलिएटिव्ह केअर बाबत कार्यवाही सुरु

## वैदयकिय उपचारासह मानसिक आधारासाठी समुपदेशन, आहार सल्ला ही मिळणार



गावपातळीवरील गंभीर, पूर्णपणे वरे न होणाऱ्या आजारांनी ग्रस्त, दीर्घकालीन वेदना सहन करणारे तसेच अंथरुणाला खिळून असलेले रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दिलासादायक ठरणारी पॅलिएटिव्ह केअर सेवा राज्यात सुरु करण्यात आली आहे. या सेवांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा पॅलिएटिव्ह केअर समिती स्थापन करण्यात आली असून पूर्ण जिल्ह्यातही या सेवेची लवकरच अंमलबजावणी सुरू होणार आहे.या सेवेमुळे केवळ वैद्यकीय उपचारच नव्हे, तर वेदना कमी करणे, मानसिक आधार देणे, तसेच रुग्ण व नातेवाइकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ही सेवा गावपातळीपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे.गंभीर, दीर्घकालीन किंवा पूर्णपणे बरे न होणाऱ्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या वेदना कमी करणे, त्याना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक आधार देणे ही पॅलिएटिव्ह केअर सेवेची संकल्पना आहे. रुग्ण बरा होईलच याबरोबरच उर्वरित आयुष्य सन्मानाने आणि वेदनारहित जगता यावे, यावर या सेवेचा भर देण्यात येणार आहे. जिल्हा पॅलिएटिव्ह केअर समिती स्थापन-जिल्हास्तरावरपॅलिएटिव्ह केअर सेवेचे नियोजन, अंमलबजावणी, समन्वय व देखरेख करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे. मा. जिल्हा शल्यचिकित्सक अध्यक्ष म्हणून काम पाहतात. वैद्यकीय तज्ज्ञ, परिचारिका, सामजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या समितीत सहभागी करून घेण्यात येणार आहेत. जिल्हयातील रुग्णांना घरपोच मिळणार-उपचार सेवा अंथरुणाला खिळून असलेल्या रुग्णांसाठी घरपोच पॅलिएटिव्ह केअर सेवा देण्यावर भर देण्यात येणार आहे. वैद्यकिय सल्ला, वेदनाशामक उपचार, समुपदेशन आणि काळजीविषयक मार्गदर्शन रुग्णांच्या घरीच दिले जाणार आहे. यामुळे दीर्घकाळापासून अंथरुणाला खिळलेल्या रुग्णांना व कुटुंबियांना या सेवेमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. पॅलिएटिव्ह केअर रुग्णांसाठी स्वतंत्र बेड राखीव गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांची काळजी घेण्यासाठी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये आणि निवडक ग्रामीण रुग्णालयांमध्ये पॅलिएटिव्ह केअर रुग्णांसाठी स्वतंत्र वेड राखीव ठेवण्यात येणार आहेत. रुग्णसंख्येनुसार ही सुविधा टप्प्याटप्प्याने वाढवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले. कोणत्या रुग्णांसाठी? कॅन्सर, शेवटच्या टप्प्यातीलकिडनी,लिव्हर आजार, हृदयविकार, न्यूरोलॉजिकल व डायलेसिस, वृद्धापकाळातील आजार इ. साठी. वेदनाशामक औपधे, पोपण सल्ला, नर्सिंग केअर, परगुती काळजी व मार्गदर्शन याचा यात समावेश. पॅलिएटिव्ह केअर सेवा ही केवळ उपचारांची नव्हे, तर मानवी संवेदनांची सेवा आहे. गंभीर आजाराने त्रस्त रुग्णांना वेदनारहित आणि सन्मानाने जगता यावे, यासाठी ही सेवा गावपातळीपर्यंत प्रभावीपणे राबवली जाणार आहे. जिल्हा रुग्णालयात दहा व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये प्रत्येकी दोन खाटा अशा रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत. अशी माहिती डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा शल्यचिकित्सक,जिल्हा रुग्णालय, सोलापूर यांनी दिली. गावपातळीपर्यंत सेवा प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, आशा कार्यकर्त्या, एएनएम यांच्या माध्यमातून रुग्णांचा शोध घेणे व नोंद करुन त्यांना पॅलिएटिव्ह केअर सेवेशी जोडले जाणार आहे. आवश्यकतेनुसार रुग्णांना पुढील स्तरावरील आरोग्य संस्थांकडे संदर्भित केले जाईल.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करून शिवजयंती उत्सवाची झाली सुरुवात



सोलापूर शहरात शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात शिवजयंती उत्सवाला प्रारंभ करण्यात आला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमास शहरातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार सुभाष देशमुख, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर तसेच सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या हस्ते महाराजांच्या मूर्तीची विधिवत पूजा व आरती करण्यात आली. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. ढोल-ताशांच्या गजरात आणि भगव्या वातावरणात नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता डाळिंब आड येथील मैदानात भगव्या ध्वजाचे अनावरण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करून शिवजयंती उत्सवाचा औपचारिक शुभारंभ झाला.

दरम्यान, १९ फेब्रुवारीपर्यंत विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक, महिलांसाठी विशेष उपक्रम, कुस्ती स्पर्धा तसेच युवकांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

यंदाच्या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे महापालिकेतील नगर अभियंता विभाग, विद्युत विभाग तसेच घनकचरा विभागातील स्वच्छता कर्मचारी महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. समाजाच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करून आयोजकांनी सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश दिला.


यावेळी मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्ट अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बरडे-बचुटे यांच्यासह संजीवनी मुळे, उज्वला साळुंखे, राजन जाधव, श्रीकांत डांगे, श्रीकांत घाडगे, नगरसेवक विनोद भोसले, शिवाजी वाघमोडे, ज्ञानेश्वर सपाटे, बाबासाहेब जाधव, दत्तामामा मुळे, सुशील बंदपट्टे, आशुतोष बरडे, विजय पुकाळे, प्रकाश ननवरे, भाऊसाहेब रोडगे, राजू काकडे, बापू जाधव, सुषमाताई घाडगे, मनीषा माने, चारुशीला जगदाळे आदींसह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास घुले व सचिन स्वामी यांनी परिश्रम घेतले, तर सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.

# दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवामध्ये सोलापूर विद्यापीठाची उल्लेखनीय कामगिरी!

## तब्बल १३ पारितोषिके मिळवून चमकदार यश

सोलापूर- अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली यांच्या वतीने म्हैसूर येथे आयोजित ३९ व्या दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सव-२०२६ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने ऐतिहासिक व अभूतपूर्व अशी कामगिरी नोंदवित एकूण १३ पारितोषिके पटकावली. त्यामध्ये ११ वैयक्तिक व सांघिक स्पर्धांतील बक्षिसांसह दोन विभागांतील सर्वसाधारण विजेतेपदे मिळवून विद्यापीठाने आजवरची सर्वोच्च कामगिरी साध्य केली आहे. विभागीय महोत्सवाच्या इतिहासात प्रथमच विद्यापीठाला वैयक्तिक आणि सामूहिक कलाप्रकारांत एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने पारितोषिके मिळाल्याने हा विक्रम विशेष ठरला आहे. दि. ९ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत उत्साहपूर्ण वातावरणात ही स्पर्धा झाली. कर्नाटक, महाराष्ट्र आणि गोवा या तीन राज्यांतील एकूण ३६ विद्यापीठांचा सहभाग लाभलेल्या या महोत्सवात विविध कला प्रकारांतील चुरशीच्या स्पर्धांनी रंगत आणली. ललित कला विभागात 'जनरल चॅम्पियन ट्रॉफी'मध्ये द्वितीय क्रमांक ललित कला विभागात विद्यापीठाने एकूण द्वितीय विजेतेपद मिळवले. कार्टूनिंग आणि पोस्टर मेकिंग या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत आपले वर्चस्व सिद्ध केले. तसेच कोलाज आणि ऑन द स्पॉट पेंटिंग या प्रकारांत चतुर्थ क्रमांक, तर रांगोळी स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवून सर्वांगीण गुणवत्ता दाखवून दिली. वायय विभागात तृतीय क्रमांक वाययीन स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. 'जनरल चॅम्पियन ट्रॉफी'मध्ये तृतीय क्रमांक पटकावत विद्यापीठाने आपली बौद्धिक ताकद सिद्ध केली. हिंदी वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक, तर हिंदी वादविवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून विद्यार्थ्यांनी प्रभावी मांडणी व विचारशक्तीचे दर्शन घडवले. इतर कला प्रकारांमध्येही यशाची नोंद मीमिक्री स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत विद्यार्थ्यांनी अभिनय कौशल्याची छाप पाडली. फोक ऑर्केस्ट्रा आणि क्रिएटिव्ह कोरिओग्राफी या प्रकारांत चतुर्थ क्रमांक, तर तालवाद्य स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवत सांघिक सादरीकरणातही विद्यापीठाने भरीव कामगिरी केली. विद्यापीठाच्या या यशाबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे तसेच विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध तयारी आणि सर्जनशीलतेच्या जोरावर हे यश संपादन केल्याचे त्यांनी नमूद केले. या यशामुळे विद्यापीठाची कला, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील गुणवत्ता अधोरेखित झाली असून भविष्यातही अशाच प्रकारे राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल यश मिळवण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# कासाळगंगा नदीच्या पुनर्जीवनामुळे सांगोला, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील २३ गावे झाली हिरवीगार



सोलापूर, दि. १२:- दुष्काळाने जर्जर असलेल्या सांगोला, पंढरपूर, माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यातील २३ गावे- वाड्यावासियांनी कासाळगंगा ओढ्याचे ४२ किलोमीटर पुनर्जीवन करत नदी साकारली. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेकडून ४ कोटी ५७ लाखाचा सीएसआरचा निधी या कामासाठी मिळाला. कासाळगंगा नदी पूर आणि दुष्काळ मुक्तीचे मॉडेल बनले असून गाळाने पडीक जमीन लागवडीखाली येत माळरानावर फळबागा फुलल्या आहेत. त्यामुळे या भागातील नागरिकांचे स्थलांतर थांबण्यास मदत झाली आहे, ही बाब खूप महत्त्वपूर्ण आहे.

कासाळगंगा ओढ्याचे पहिल्या टप्प्यात ५ किलोमीटर लांबीचे पुनर्जीवन महूद (ता. सांगोला) ग्रामस्थांनी लोकसहभागातून केले. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्याला उपलब्ध करून दिलेल्या निधीतून डिझेल खर्चाचे सहाय्य झाले. पाणी उपलब्ध होत असतानाच पुनर्जीवन कामातून उपलब्ध झालेल्या गाळातून पडीक क्षेत्र लागवडीखाली आले. अतिक्रमण काढताना जमिनीच्या तुकड्यापेक्षा पाणी महत्वाचे मानले गेल्याने प्रशासकीय मदतीची आवश्यकता भासली नाही.

टाटा समूहाच्या वारशातून प्रेरित टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस व त्यांच्या उद्ठ शाखा ढ्ठड फाउंडेशन यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक व नैसर्गिक वारसा जपण्यासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले आहेत. त्यापैकी सोलापूर जिल्ह्यातील ४२ किमी लांबीच्या कासाळगंगा नदीचे पुनरुज्जीवन ढ्ठड ने केले. ४ कोटी ५७ लाख खर्चून नदीपात्रातील गाळ काढणे, बंधाऱ्याची स्थिरता व वृक्षारोपण करण्यात आले. यामुळे २४ गावे व ३ तालुक्यांना लाभ झाला. भूजलपातळी वाढली, पिकांच्या पद्धतीत बदल झाला व स्थलांतर थांबले व उलट स्थलांतरित नागरिक वापस येण्याची प्रक्रिया सुरू झाली. ढ्ठड च्या या उपक्रमांमुळे महाराष्ट्रातील नैसर्गिक संसाधनांचे पुनरुज्जीवन होऊन सामाजिक-आर्थिक बदल घडत आहेत.

# विद्यार्थी काँग्रेस च्या महाराष्ट्र सचिव पदी ॲड. श्रीराम हंगरगेकर यांची निवड



तुळजापूर (प्रतिनीधी ) महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी देविचे पुजारी आणि पुणे येथिल आय एल एस लॉ कॉलेजचे विद्यार्थी असलेले ॲड. श्रीराम अशोकराव हंगरगेकर यांची राष्ट्रीय विद्यार्थी संघ भारत विद्यार्थी कॉंग्रेस महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आली आहे. ॲड.श्रीराम हंगरगेकर यांनी पुणे येथे स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणा-या विद्रयार्थींच्या विविध मागण्यासाठी प्रत्येक्ष रस्याष्वर उतरून आंदोलन करत लढा उभारला होता. तसेच शेतक-यांच्या न्याय हक्कांच्या प्रश्नांवर आवाज उठवला आहे. शैक्षणिक, सामाजिक प्रश्नांवर आंदोलन करून लढे उभारले आहे. समाज हिताच्या न्यायींक कामाची पोहच म्हणून ही नियुक्ती करण्यात आली आहे. ॲड. श्रीराम हंगरगेकर हे तुळजापूर चे माजी आमदार कै. साहेबराव हंगरगेकर यांचे नातू आहेत. दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की राष्ट्रीय विद्यार्थी संघ भारतचे राष्ट्रीय प्रभारी कन्हैया कुमार,राष्ट्रीय अध्यक्ष वरुण चौघरी यांच्या मान्यतेने, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीय विद्यार्थी संघ भारतच्या प्रदेश सचिवांची नियुक्ती जाहीर करण्यात येत आहे. नियुक्त पदाधिकाऱ्यांचे मनः पूर्वक अभिनंदन तसेच पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा असे नमूद केले आहे.

नियुक्ती पत्रावर राष्ट्रीय विद्यार्थी संघ भारतचे राष्ट्रीय सचिव महाराष्ट्र प्रभारी अक्षय यादव क्रांतीवीर, महाराष्ट्र प्रभारी क्रांता ग्वाला, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सागर साळुंके यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तांड्यापासून अंतराळापर्यंत

## ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना शासनाची साथ

मुंबई, दि. १३ : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विज्ञान प्रेरणा अभियान अंतर्गत विजाभज आश्रमशाळांमधील १०० गुणवंत विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) येथे विशेष शैक्षणिक विज्ञान सहलीचे १५ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

मंत्री सावे म्हणाले, ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाविषयी जिज्ञासा, संशोधनाची वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून त्या संधीं ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राप्त होण्यासाठी शासनाने विशेष उपक्रम हाती घेतला.

मंत्री सावे म्हणाले, राज्यातील विविध 'विजाभज' आश्रमशाळांमधून गुणवत्ता परीक्षेद्वारे १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना इस्त्रो येथे भेट देऊन उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण तंत्रज्ञान, प्रत्यक्ष रॉकेटचे प्रक्षेपण पाहणे आणि अंतराळ संशोधन प्रकल्पांविषयी प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच विज्ञानविषयक कार्यशाळा आणि शास्त्रज्ञांशी, तज्ज्ञांशी संवादाच्या माध्यमातून त्यांना अनुभवाधारित शिक्षणाचा लाभ होणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील वैज्ञानिक संस्थांशी जोडणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि उच्च शिक्षणाच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांचा प्रवास विमानाने होणार असून त्यांच्या सुरक्षित व सुसूत्र प्रवासाची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट दर्जाची निवास व्यवस्था करण्यात आली असून दररोज आवश्यक सर्व सुविधा व साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे. असा उपक्रम विभागामार्फत पहिल्यांदाच राबविण्यात येत आहे.

९८० शाळांतून निवडलेले १०० गुणवंत विद्यार्थी

राज्यातील ९८० विजाभज आश्रमशाळांमधून इयत्ता ९ वी व ११ वीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता परीक्षा घेण्यात आली. त्यातून ५० विद्यार्थी व ५० विद्यार्थीनी अशा एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

सहलीचे नियोजन :-

विद्यार्थी १५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत पुणे, बेंगलुरू, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी या शहरातील विविध ठिकाणांना भेटी देणार आहेत.

ङ १५ फेब्रुवारी रोजी पुणे - पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क व नॅशनल वॉर मेमोरियल येथे भेट.

ङ १६ फेब्रुवारी पुणे - भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था येथे प्रयोगाधारित विज्ञान कार्यशाळा व शास्त्रज्ञांशी संवाद.

ङ १६ फेब्रुवारी रोजी पुणे विमानतळावर मंत्री अतुल सावे व विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून इस्त्रो दौऱ्यासाठी हिरवी झेंडी दाखवणार आहेत.

ङ १७ फेब्रुवारी बंगळुरू – विश्वेश्वरय्या औद्योगिक व तंत्रज्ञान संग्रहालय, हिंदुस्तान विमान निर्मिती वारसा संग्रहालय व लालबाग वनस्पती उद्यान भेट.

ङ १८ फेब्रुवारी तिरुवनंतपुरम (थुंबा) - भारतीय अंतराळ संशोधन संस्था केंद्र, उपग्रह प्रदर्शन विभाग व प्रक्षेपण तंत्रज्ञान गॅलरी भेट ; रॉकेट प्रक्षेपणाचे अवलोकन. तसेच नेपियर संग्रहालय व कोवलम समुद्रकिनारा भेट.

ङ १९ फेब्रुवारी कन्याकुमारी - पद्मनाभपुरम राजवाडा, विवेकानंद शिला स्मारक, तिरुवल्लुवर पुतळा, गांधी स्मारक तसेच सूर्यास्त दर्शन.

# व्हॅलेंटाईन डेच्या पार्श्वभूमीवर तुळजापुरात कडक बंदोबस्ताची मागणी

## हिंदू जनजागृती समितीचे तुळजापूर पोलीस स्टेशनला निवेदन

तुळजापूर । प्रतिनिधी । दि. १३ फेब्रुवारी २०२६ १४ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या 'व्हॅलेंटाईन डे'च्या पार्श्वभूमीवर शहरात व परिसरात होणाऱ्या संभाव्य गैरप्रकारांना आळा घालावा, महिलांची सुरक्षितता अबाधित राखावी तसेच कायदा-सुव्यवस्था मजबूत ठेवावी, या मागणीसाठी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने आज १३ फेब्रुवारी २०२६ रोजी तुळजापूर पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले. हे निवेदन सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे यांनी स्वीकारून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने सार्वजनिक ठिकाणी काही समाजविघातक प्रवृत्तींकडून गैरवर्तन, अश्लील चाळे, महिलांची छेडछाड, हुल्लडबाजी तसेच कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणारे प्रकार घडण्याची शक्यता असते. प्रेम व्यक्त करण्याच्या नावाखाली सामाजिक शिस्त मोडणारे वर्तन वाढत असून, याचा थेट परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवर व तरुण पिढीवर होत असल्याची गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः बसस्थानके, उद्याने, महाविद्यालय परिसर, पर्यटनस्थळे, सार्वजनिक चौक, हॉटेल्स, लॉज व रिसॉर्ट्स या ठिकाणी गैरप्रकारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने, या ठिकाणी विशेष पोलीस पथके तैनात करावीत, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. मोठ्या आवाजात संगीत वाजवत फिरणारे, बेदरकार वाहनचालक, संशयास्पद हालचाली करणारे गट तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी गस्त वाढवणे, विशेष पथके तैनात करणे व कोणतीही अनुचित घटना घडल्यास



मद्यपान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. व्हॅलेंटाईन डेच्या काळात मद्य, अमली पदार्थ व इतर नशायुक्त पदार्थांचा वापर वाढतो, अशी बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे. काही ठिकाणी तरुणांना लक्ष्य करून अमली पदार्थांची विक्री होत असल्याच्या तक्रारी असून, यामुळे युवक-युवती व्यसनाधीनतेकडे झुकत आहेत. परिणामी त्यांचे आरोग्य, शिक्षण व सामाजिक वातावरण बिघडत असल्याचे समितीने स्पष्ट केले. शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात संशयास्पद तरुणांची चौकशी करून प्रतिबंधात्मक कारवाई करावी. तसेच हॉटेल्स, लॉज व रिसॉर्ट्समध्ये नियमांचे उल्लंघन होत असल्यास तात्काळ तपासणी करून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तात्काळ गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे यांनी निवेदन स्वीकारताना, तुळजापूर शहरात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले. दरम्यान, नागरिकांनीही सामाजिक भान राखून कोणताही गैरप्रकार आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. व्हॅलेंटाईन डेच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर पोलीस प्रशासनाकडून कोणती पावले उचलली जातात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले असून, शांतता व सुरक्षिततेसाठी कडक अंमलबजावणीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वाकायामा प्रांताशी सहकार्य अधिक दृढ करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. १३ : महाराष्ट्र आणि जपानच्या वाकायामा प्रांतामधील संबंध मैत्रीपूर्ण आहेत. तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रात सहकार्य अधिक वाढवून हे संबंध येणाऱ्या काळात अधिक दृढ करण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.जपानसोबतचे आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.जपानच्या वाकायामा प्रांताचे राज्यपाल मियाझाकी इजुमी यांनी जपानच्या शिष्टमंडळासह हॉटेल ताजमहल येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, जपानचे मुंबईतील महावाणिज्यदूत यागी कोजी, वाकायामा विधानसभेचे उपाध्यक्ष अकिझुकी फुमिनारी यांच्यासह जपानचे शासन, विधिमंडळ, सांस्कृतिक, क्रीडा, उद्योग आदी विविध क्षेत्रातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई ही भारताची आर्थिक, व्यावसायिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन व्यवसायाची राजधानी आहे. 'सिस्टर स्टेट' असलेल्या महाराष्ट्राचे आणि वाकायामा प्रांताचे अनेक वर्षांपासून मैत्रीचे संबंध आहेत. महाराष्ट्र आणि वाकायामा प्रांतादरम्यान २०१३ मध्ये सहकार्याचा सामंजस्य करार झाला होता आणि २०२३ मध्ये त्याचे नूतनीकरण करण्यात आले. या कालावधीत दोन्ही राज्यांमध्ये सांस्कृतिक, क्रीडा, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय देवाणघेवाण झाली आहे. वाकायामा प्रांताच्या सहकार्याने जपानी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून अजिंठा परिसरातही जपानी पर्यटकांसाठी सुविधा उभारण्यात आल्या आहेत.दोन वेळा झालेल्या जपान दौऱ्यादरम्यान वाकायामा आणि कोयासन येथे भेट दिल्याच्या आठवणी सांगून कोयासन विद्यापीठात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले, हे दोन्ही देशांतील मैत्रीचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. २०२३ मध्ये वाकायामाचे दिवंगत राज्यपाल यांच्या उपस्थितीत सुमो पहेलवानांचा संघ मुंबईत आला होता. गेटवे ऑफ इंडिया परिसरात सुमो आणि भारतीय कुस्तीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याची आठवण त्यांनी सांगितली. सध्या जपानचे सुमो पहेलवान पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात प्रशिक्षण घेत आहेत. या क्रीडा क्षेत्रातील देवाणघेवाणीमुळे दोन्ही देशांना उत्कृष्ट खेळाडू घडविण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.जपानचे दिवंगत पंतप्रधान शिंजो आबे यांची आठवण करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, त्यांनी भारताशी मैत्री अधिक दृढ केली. त्यांच्या कार्यकाळात मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाले. मुंबईत ४० कि.मी. लांबीची भूमिगत मेट्रो, २२ कि.मी. लांबीचा देशातील सर्वात मोठा समुद्री पूल उभारण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.नागपूर येथे बामियानच्या बुद्ध पुतळ्याची प्रतिकृती उभारणारअफगाणिस्तानातील बामियानच्या गौतम बुद्धांच्या पुतळ्याच्या विध्वंसाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथे त्या पुतळ्याची प्रतिकृती उभारण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपालांना दिला. नागपूर शहर डॉ.आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारून पुनरुज्जीवन घडवून आणलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. या उपक्रमातून जगाला शांततेचा संदेश जाईल आणि भारत-जपान मैत्रीचे प्रतीक निर्माण होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## निकृष्ट रस्ता दुरुस्तीविरोधात निलेश संगेपाग यांचा अन्नत्याग आंदोलन दुसऱ्या दिवशीही सुरू.




सोलापूर ; प्रभाग क्र. १५ मधील कोणापुरे चाळ परिसरात पाईपलाईन कामानंतर करण्यात आलेल्या कथित निकृष्ट रस्ता दुरुस्तीविरोधात सुरू असलेले निलेश श्रीनिवास संगेपाग यांचे अन्नत्याग आंदोलन आज दुसऱ्या दिवशीही सुरू राहिले. प्रशासनाकडून अद्याप ठोस निर्णय न झाल्याने आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सदर परिसरात पाईपलाईन काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करताना संपूर्ण रुंदीमध्ये Like to Like पद्धतीने डांबरीकरण न करता अत्यल्प जाडीचे नियमबाह्य अर्धा ते एक इंच काँक्रीट टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी रस्त्यावर धूळ उडणे, खड्डे निर्माण होणे व वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहे.

या संदर्भात संगेपाग यांनी यापूर्वी म हा न ग र पा लि का प्र शा स ना क डे ना ग रि कां च्या पाठिंब्यासह लेखी निवेदने देऊन संबंधित कंत्राटदारावर व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व दर्जेदार डांबरीकरणाची मागणी केली होती. मात्र सम ाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी १२ फ ेब्रुवारीपासून शांततामय अन्नत्याग आंदोलनास सुरुवात केली आहे. आंदोलनाच्या पहिल्या दिवशी पासून परिसरातील शेकडो नागरिकांनी आंदोलन स्थळी भेट देत लेखी पाठिंबा नोंदविला. हा लढा केवळ एका व्यक्तींचा नसून संपूर्ण परिसराच्या सुरक्षिततेचा आहे, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने जबाबदार व्यक्तींवर आणि अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा निलेश संगेपाग यांनी दिला आहे. आंदोलन स्थळी श्रीकांत वाघमारे, जुबेर हिरापुरे, मल्लिकार्जुन पिलगेरी, आकाश गायकवाड, सुचित्रा वाघमारे, यांच्यासह अनेक जन सोबत उपस्थित राहत आहेत.

## महापालिकेची वीस तारखेला पहिली सर्वसाधारण बैठक ; यामध्ये १० स्वीकृत सदस्यांची होणार निवड



सोलापूर ; सोलापूर म हापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलवण्यात आली आहे. या सभेमध्ये १० स्वीकृत सदस्य, स्थावी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. स्वीकृत सदस्यासाठी बुधवारपासून अर्ज स्वीकृती होणार आहे.

नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार आहे. ही सभा शुक्रवार, २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता म हानगरपालिकेच्या

कै, यशवंतराव बळवंतराव सभागृह (कौन्सिल हॉल) येथे होणार आहे. महापालिकेचे नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी या सभेचा अजेंडा प्रसिध्द केला आहे. या अजेंड्यानुसार विविध नेमणुका होणार आहेत. महापालिकेच्या नामनिर्दे शित अर्थात १० स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीकरिता संबंधितांना बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत महापालिकेतील आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करावे लागणार आहे, असे म हापालिका सभेच्या अजेंड्यात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० (२) म ध्ये तरतूद केल्याप्रमाणे आयुक्त यांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे स्थायी समितीच्या १६ सदस्याच्या नेम णुका करण्यात येणार आहेत. आयक्तांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे १२ सदस्यांची नेमणुका करण्याचा विषय सभेच्या अजेंड्यावर आहे. याशिवाय महाराष्ट्र म हानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ नुसार सोलापूर महानगरपालिकेत १० नामनिर्दे शित सदस्यांची आयुक्तांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूदप्रमाणे नियुक्ती करण्याचा विषय सभेपुढे ठेवण्यात आला आहे. प्रशासकिय प्रस्तावांबरोबर सभासद प्रस्तावदेखील सभा पटलावर आहेत.

अनेक इच्छुक: लॉटरी कोणाला लागणार

दि. २० रोजीच्या सभेत १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. स्वीकृत सदस्यासाठी भाजप कार्यालयात शेकडो अर्ज आले आहेत. आता परिवहन सदस्यपद आणि सभापतीपद मिळवण्यासाठी लॉबींग होणार आहे. ज्या इच्छुकांची स्वीकृत सदस्यपदी वर्णी लागणार नाही, त्यांचा परिवहनसाठी विचार केला जाण्याची शक्यता आहे.

तडवळवकर यांचे नाव निश्चित

भाजपकडून ९ स्वीकृत सदस्य निवडले जाणार आहेत. यामध्ये भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. उर्वरित ८ सदस्यांमध्ये कोणाचा नंबर लागणार याची उत्सुकता आहे. मिळालेल्या माहितीनुसार देवेंद्र कोठे यांच्याकडे चार, आ. विजय देशमुख आणि सुभाष देशमुख यांच्या गटाकडील प्रत्येकी दोन सदस्यांना स्वीकृतची संधी मि ळेल, असे बोलले जात आहे.

## कोल्हापूरमध्ये मंदिर प्रीमियर लीगचे दुसरे पर्व तुळजाभवानी संस्थानचे दोन संघ सज्ज



तुळजापूर : देशभरातील विविध मंदिर संस्थानांम धील कर्मचाऱ्यांना एकत्र आणून आपसातील एकोपा, संघभावना आणि क्रीडासंस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षापासून कोल्हापूर येथे मंदिर प्रीमियर लीग या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धे चे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेचे यंदाचे दुसरे पर्व दिनांक १४, १५ व १६ फेब्रुवारी २०२६ रोजी शास्त्री नगर मैदान, कोल्हापूर येथे मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत राज्यासह देशभरातील विविध मंदिर संस्थानांचे क्रिकेट संघ सहभागी होणार असून, त्यात श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे दोन संघ मैदानात उतरणार आहेत. या स्पर्धेसाठी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे दोन्ही संघ पूर्ण तयारीनिशी सज्ज झाले असून खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या क्रिकेट संघासाठी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते श्री तुळजाभवानी देवींची महाआरती करण्यात आली. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी मंदिर संस्थानच्या संघाने उत्तम खेळाचे प्रदर्शन करून स्पर्धे त यश संपादन करावे, अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, लेखाधिकारी संतोष भेंकी यांच्यासह स्पर्धेत सहभागी होणारे सर्व खेळाडू, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार व तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांच्या हस्ते श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या क्रिकेट संघाच्या जर्सीचे अनावरण करण्यात आले. यावेळी त्यांनी दोन्ही संघ उत्कृष्ट खेळ करून संस्थानाचे नाव उज्वल करतील, असा विश्वास तहसीलदार तथा (व्यवस्थापक) प्रशासन माया माने यांनी व्यक्त केला.

मंदिर प्रीमियर लीगच्या माध्यमातून देशभरातील विविध मंदिर संस्थानांम धील कर्मचारी एकत्र येत असून, या स्पर्धेमुळे केवळ क्रीडासंस्कृतीच नव्हे तर सामाजिक एकोपा, सौहार्द आणि आपुलकीचे वातावरण निर्माण होत आहे. कोल्हापूरमध्ये होणाऱ्या या क्रिकेट लीगकडे क्रीडाप्रेमींसह सर्वांचे लक्ष लागले असून, स्पर्धेबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

## घरफोडी करणा-या विजापुर नाका गुन्हे प्रकटीकरण पथकाची दमदार कामगिरी



सोलापूर, अंत्रोळीकर नगरातील घर फोडून १४ लाखांचे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या एका चोरट्यास अटक करून त्याच्याकडून चोरलेले सर्व दागिने हस्तगत केल्याची माहिती पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. अंकित ऊर्फ अंकुश लक्ष्मण वाल्मीकि (वय ३४, रा. जुना बाजार खडकी, पुणे सध्या रा. अंबिकानगर, पारशी विहिरीजवळ, सोलापूर) यास अटक करण्यात आली. वाल्मीकि याने एका अल्पवयीन मुलासह अंत्रोळीकर नगरातून घरातून सोन्याचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी रवी प्रकाश दौलताबाद (नाय ४४) यांनी विजापूर नाका पोलिसातफिर्याद दिली होती. रवी आणि त्यांच्या आई असे दोघे हैदराबाद येथे लग्नकार्यासाठी गेले होते. तेव्हापासून ते तेथेच राहत होते. ते ४ फेब्रुवारी रोजी दुपारी अंत्रोळीकर नगर येथील घरी आल्यानंतर त्यांच्या घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले त्यांना दिसून आले. त्यांना बेडरूममधील कपाटात ठेवलेले १८.५ तोळ्याचे अंदाजे १४ लाख रुपये किमतीचे दागिने चोरीला गेले होते.

पोलिसांनी अंत्रोळीकर नगर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी वाल्मीकि व त्याच्या अल्पवयीन म ुलाला ताब्यात घेऊन या चोरीचा शोध लावावा. पोलिसांनी या दोघांकडून चोरीस गेलेले सुमारे १४ लाखांचे दागिने हस्तगत केले आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त दिलीप पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासाहेब गायकवाड, सुशांत वराळे, सहायक पोलीस निरीक्षक शीतलकुमार गायकवाड, सहायक फौजदार आप्पा पवार, पोलीस अंमलदार सचिन हार, अजय परदेशी, गणेश शिर्के, लक्ष्मीकांत फुटाणे, सम ाधान मारकड आदींनी केली.

# सांगवी काटी येथे सत्कार टाळून शैक्षणिक साहित्य वाटप.

## पं. स. सदस्या गवळी यांच्या आवाहनाला नागरिकांचा प्रतिसाद.

तुळजापूर/प्रतिनिधी

सांगवी काटी, ता. तुळजापूर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये तामलवाडी पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्या सौ. संगिता जगन्नाथ गवळी यांच्या निवडीबद्दल शैक्षणिक साहित्य (वह्या व पेन) वाटप करण्यात आले. नवनियुक्त सदस्या गवळी यांनी सर्व मित्र परिवाराला सत्कार नको तर सेवेची संधी द्या व



हार फेटे नको तर वही-पेन द्या असे भावनिक आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत मगर सांगवी येथील मित्र परिवाराच्या वतीने वह्या व पेन शिवसेना तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी व मुख्याध्यापक यांच्या हस्ते जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत मा. मुख्याध्यापक यांच्या वतीने या उपक्रमाचे स्वागत केले. राजकीय व पक्षीय विरोध बाजूला ठेऊन विकासासाठी सर्वजण एकत्र येण्याचे आवाहन यावेळी तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी यांनी उपस्थित नागरिकांना केले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी यांच्यासह सांगवी काटी चे सरपंच अमोल पाटील, अप्पासाहेब मगर, रामा मगर, लक्ष्मण मगर, सतीश शेळके, शामराव मगर, कालिदास मगर, मधुकर मगर, बाबुराव मगर, शेषेराव मंडुळे, साधू शिंदे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# बाळगी सोलापूर एस टी महामंडळ सेवा रामभरोसे,

## नागरिक आणि विद्यार्थ्याचे हाल -रमेश वाघमारे

दैनिक राजस्व अशोक सोनकंटले प्रतिनिधी दक्षिण सोलापूर दक्षिण सोलापूर तालुक्यातील बाळगी सोलापूर एस टी महामंडळ सेवा रामभरोसे, नागरिक आणि विद्यार्थ्याचे हाल होत असून सोलापूर वरून येणारी दुपारी ३ ची एसटी भंडारकवठे मार्गे येणारे एसटी बाळगी गावाची ५ ला येत असतो तर एसटी भंडारकवठे पर्यतच येऊन तिथूनच एसटी बाळगी न जाता परत सोलापूर जात असलेबाबत तक्रारी असून त्याबाबत संबधित चालक आणि वाहक यांची चौकशी करून कारवाई त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.त्यामुळे शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी व कॉलेज चे मुले व मुली व आठवडा बाजार भंडारकवठेचे दर गुरूवारी व दैनंदिन दळणवळण व वयोवृध्द व इतर अपंग प्रवासी लोकांना त्यांना भंडारकवठे बरेच दिवसापासून मध्येच उतरवातात व बाळगीला येत नाही कधीतरी आठवडयामध्युन १-२ वेळा येतात. दिनांक १०/०२/२०२६ समर्थ वाघमारे यांनी काल कॉलेजला गेले होते मंद्रुप मध्ये सोलापूर ते भंडारकवठे मार्गे बाळगी एसटी ला प्रवास करत असताना. त्यांना चालक स्वामी व वाहक चिंचोळे यांनी दोघांनी मिळून त्या विद्यार्थ्यांना भंडारकवठे मध्येच उतरविले तरी तिथे भंडारकवठे गावामध्ये ४-५ प्रवासी होते व बाळगीचे प्रवासी सुद्धा होते तरी त्यांनी बाळगीला एस टी आले नाही.तरी तो विद्यार्थी तक्रार पुस्तक व सेवा पुस्तक वाहक व चालक यांना मागितल्यावर तक्रार पुस्तक दिले नाही व उडवाउडवीचे उत्तर दिले आहे. तरी त्याची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी प्रवासी मधून होत आहे. वाहक आणि चालक हे प्रवासी सोबत अरेरावाची भाषा वापरून प्रवाशी यांना धमकावले जात असून रमेश शरणप्पा वाघमारे यांनी.रीतसर जिल्हाधिकारी कार्यालयात चौकशी करून कारवाई व्हावी अशी अर्जाद्वारे मागणी केली आहे. दिवशी सुध्दा रमेश वाघमारे आणि त्याची आई भंडारकवठेला जाऊन एस.टी मधून सोलापूरला गेलो त्यादिवशीचे एस.टी नं. एम एच १३सी यू ६८५१ही एस टी महामंडळ बस बाळगीला आलेली नाही दि. १०/०२/०२०२६ शालेय मुलाने प्रवास केलेले एस.टी चे नं. एम. एच. १४ बी टी ५०२६ सदर वाहन चालक व कंडक्टर यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्यास विनंती व त्यांचे एस.टी डेपोचे नियंत्रण करणारे अधिकारी यांची सुध्दा चौकशी होणे विनंती व संबधित अधिकारी बाळगी या गावाला जाणून भुजून त्यामुळे प्रवाशांना हाल होत असल्याने तरी वरिष्ठ आधिकारी यांनी यांचे दखल घेऊन चौकशी करून एस टी महामंडळ सेवा सुरळीत करावे अशी मागणी करण्यात येत आहे.अन्यथा कारवाई न झाल्यास मा. जिल्हाधिकारी कार्यालयसमोर बाळगीचे प्रवासी व विद्यार्थ्यांना घेऊन उपोषण करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामास सरकार जबाबदार असेल असे बाळगीचे माजी सरपंच रमेश वाघमारे यांनी निवेदना द्वारे जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

# घरात कुणी नव्हतं, जावा-जावांचं बिनसलं, बार्शीत भयंकर घडलं

सोलापूर - ज्या घरात आनंदाने गृहप्रवेश केला, त्याच घरात अवघ्या दोन महिन्यांत एका नवविवाहितेचा करुण अंत झाला. दागिने चोरीचा संशय व्यक्त केल्याच्या रागातून जावेनेच आपल्या धाकट्या जावेचा गळा आवळून खून केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिला पेटवून दिले. या धक्कादायक घटनेत बार्शी सत्र न्यायालयाने आरोपी जाऊ गीता शंकर पाडोळे हिला जन्मठेपेची कठोर शिक्षा सुनावली आहे.

उज्ज्वला किरण पाडोळे (राहणार अंजनगाव) हिचे लग्न २९ नोव्हेंबर २०२२ रोजी झाले होते. लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यांत २ फेब्रुवारी २०२३ रोजी तिचा संशयास्पद मृत्यू झाला. लग्नात मिळालेले सोन्याचे दागिने कपाटातून गायब झाल्याची बाब



उज्ज्वलाच्या लक्षात आली होती. याबाबत तिने जाऊ गीता हिच्याकडे वारंवार चौकशी केली. याच वादातून आरोपीने घरात कोणी नसताना उज्ज्वलाचा गळा दाबून खून केला आणि ती जळाली असल्याचे भासवण्यासाठी मृतदेहाला आग लावल्याचा आरोप होता.मृत उज्ज्वला हिचे वडील सिद्धेश्वर जाधव यांनी माढा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. खटल्यादरम्यान शवविच्छेदन करणारे डॉ. सदानंद व्हनकळस यांनी दिलेल्या वैद्यकिय साक्षीला महत्त्व प्राप्त झाले. प्रत्यक्ष साक्षीदार नसतानाही परिस्थितीजन्य व वैद्यकिय पुराव्यांच्या आधारे न्यायाधीशांनी आरोपीला खुनाबद्दल जन्मठेप व ५ हजार रुपये दंड, तसेच पुरावा नष्ट केल्याबद्दल ३ वर्षे कारावास व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

# सोलापूरच्या अर्थकारणाला पाठिंबा देणारे प्रदर्शन :डॉक्टर ओंबासे

## इलेक्ट्रो २०२६ प्रदर्शनाचे थाटात उदघाटन

सोलापूर, दि. १२- इलेक्ट्रो प्रदर्शन हे सोलापूरच्या अर्थकारणाला पाठिंबा देणारे असल्याचे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांनी स्पष्ट केले. सोलापूरचे जास्तीत जास्त नागरिकांनी इलेक्ट्रो २०२६ प्रदर्शनाचा फायदा घ्यावा,असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांनी केले. या प्रदर्शनात प्रतिवर्षी ५० कोटींची उलाढाल होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रदर्शनाचे मुख्य प्रायोजक व्ही प्लस कंपनीचे सीईओ संदीप पाटील यांनी कंपनीचे लॉन्च सोलापुरात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. पी प्लस च्या माध्यमातून भारतीय बनावटीचे उत्पादन करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नवीन तंत्रज्ञानाचे प्रॉडक्ट देत असल्याचे सांगून त्यांनी प्रत्येक गोष्टीत नावीन्य आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे स्पष्ट केले. सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशन द्वारा इलेक्ट्रोनिक्स, कॉम्प्युटर्स, टेलिकम्युनिकेशन, होम ॲप्लायन्सेस, सोलार व फिटनेस इक्विपमेंटस वस्तूंचे भव्य प्रदर्शन ''इलेक्ट्रो २०२६'' प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवार दि. १२ फेब्रुवारी रोजी व्ही प्लस कंपनीचे सीईओ श्री. संदीप पाटील यांच्या शुभहस्ते व महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. दि. १२ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होम मैदानावर हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यंदा इलेक्ट्रो प्रदर्शनाचे व्ही प्लस हे मुख्य प्रायोजक असून वीझी टीव्ही, हाईफा इलेक्टिकल,





द्वीप प्रज्वलन करताना आयुक्त , शेजारी डावीकडून गिरीश मुंदडा, हरीश कुकरेजा, बाबू चव्हाण,सूरज रतन धूत,संदीप पाटील, आनंद येमूळ,भूषण भुतडा,सुयोग कालानी

अपार इलेक्ट्रिकल्स्, लक्ष्मी ऑटोमोबाइल्स , एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी, बजाज फायनान्स व सॅटीसफाय मिडीया हे सह प्रायोजक आहेत.

अध्यक्ष श्री. सुरजरतन धुत प्रास्ताविक करताना म्हणाले की, इलेक्ट्रो २०२६ चे हे २६ वे वर्ष असून २५ वर्षापूर्वी २७ स्टॉल्सने सुरु झालेले हे प्रदर्शन आज जवळपास ३०० स्टॉलचे झाले आहे. आतापर्यंत इलेक्ट्रोने केलेल्या कामाची व ग्राहकांची दिलेल्या प्रतिसादाची ही पावतीच आहे, असे श्री. धुत यांनी सांगितले. या वर्षी जवळपास एक लाख पेक्षा जास्त ग्राहक प्रदर्शनास भेट देतील असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

इलेक्ट्रो चेअरमन जितेंद्र राठी यांचा संदेश शिवप्रकाश चव्हाण यांनी वाचून दाखविला. काही स्टॉल्स् सामाजिक संघटनांना विनामुल्य देण्यात आले आहेत.या प्रदर्शनात खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे आकर्षक बक्षिसे व शेवटच्या दिवशी ७ दिवसांत खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी बंपर ड्रॉमध्ये आकर्षक बक्षिस असल्याची घोषणा करण्यात आली.

प्रारंभी व्ही प्लस कंपनीचे सीईओ श्री. संदीप पाटील व महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या शुभहस्ते द्रिप प्रज्वलन करण्यात आले. व्ही प्लस कंपनीचे सुशील कुमार देशमुख व प्रफुल्ल देशमुख असेच महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांचा सत्कार करण्यात आला.

७ दिवस चालनाऱ्या इलेक्ट्रो २०२६ दररोज दु. ४ ते रा. ९.३० व रविवारी स.११ ते रा. ९.३० पर्यंत , या प्रदर्शनामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग असून एलसीडी,फ्रिज , साईड बाय साईड फ्रिज, एअर कंडीशनर, म्युझिक सिस्टीम, वॉशिंग मशीन, डिश टिव्ही, मायक्रोव्हेव ओव्हन, व्हॅक्यूम क्लिनर, एअर कंडीशनर, सोलर सिस्टीम, गॅस गिझर, मोबाईल, आय पॅड,टेलीफोन , हेल्थ इक्वीपमेंट, कॉम्प्युटर इत्यादी या प्रदर्शनामध्ये उपलब्ध करण्यात आली आहेत. अशा या प्रदर्शनामध्ये ठिकठिकाणी शुध्द पिण्याचे पाणीची सोय केलेली आहे. सर्व स्टॉल मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कंपनी कडून ट्रेनिंग देवून ग्राहकांना माहिती देण्यात येते. रक्तदान प्रसार करण्याकरीता दररोज रक्तदान शिबीराचेही आयोजन करण्यात आले असून अवयव दान विषयी जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती सचिव हरीष कुकरेजा यांनी दिली. तसेच प्रदर्शनास भेट देऊन रिल्स बनवून पाठविण्यासाठीही स्पर्धा आयोजित केली असल्याची सांगण्यात आली.

सचिव हरीष कुकरेजा यांनी स्वागत केले तर उपाध्यक्ष भुषण भुतडा यांनी आभार मानले . सुत्रसंचालन साक्षी हौदे यांनी केले.

यावेळी सुमित रामाणि, अतिफ खान पराग पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास सह सचिव श्री. गिरीश मुंदडा, खजिनदार श्री. सुयोग कालाणी , संचालक सर्वश्री चंद्रकांत शाहपुरे, रवि पाचलग, संजय नाईक, राजेंद्र बिराजदार, बसवराज नवले, आनंद येमुल, विजय टेके , सुनिल भांजे,सचिन करवा व संस्थेचे माजी अध्यक्ष सतिश मालू, केतन शाह, विपीन कुलकर्णी , दिपक मुनोत, कौशिक शाह , खुशाल देढीया, पवन मुंदडा, दत्तात्रय अंबुरे, जॉय छाबरिया, यल्लपा भोसले, गणेश सुत्रावे, संदेश कोठारी, राजेश जाजु बसवराज कडगंची, आदी उपस्थित होते.

Dainik.Rajaswa @dainik_rajaswa dainik.rajaswa Dainik Rajaswa News